SINNAR 422 103 G.M.D. ARTS, B.W. COMMERCE & SCIENCE COLLEGE

**मराठा विद्या प्रसारक समाजाचे,**

**गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,सिन्नर नाशिक.**

---

दि.२०/०९/२०२१

## ॥ श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे जयंती ॥

सोमवार दि. 20 /09 /2021 रोजी गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर येथे शैक्षणिक वर्ष 2021- 2022 मध्ये डुबेरे या गावी श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांची 321 वी जयंती साजरी करण्यात आली. बाजीरावांचे जन्मस्थळ असलेल्या ऐतिहासिक डुबेरे गावात पेशवे वाड्यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.व्ही.रसाळ यांच्या हस्ते प्रतिमेचे व श्रीमंत पतसंस्थेतील श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. बाजीरावांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक ढाल, तलवार, भाला, बंदूक यांचे पूजन करण्यात आले. बाजीरावांच्या नव्या पिढीचे वंशज प्रा.चंद्रशेखर बर्वे यांनी बाजीरावांचा इतिहास व वाड्याचे रचनेविषयी माहिती दिली. तसेच वास्तुकलेचा वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून केलेली वाड्याची रचना येणाऱ्या पिढीसाठी अभ्यासास सहाय्यक ठरेल असे मत डॉ. पी.व्ही. रसाळ यांनी व्यक्त केले. सदरील कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. डी.एम.जाधव, उपप्राचार्य पी. व्ही. सोनवणे, प्रा.एस.बी.कर्डक, डॉ.एस.टी जाधव, इतिहास विभाग प्रमुख,प्रा. श्रीमती.एस.आर.मोरे, प्रा.एस.एम.गाडे प्रा. डी.एन.वाजे प्रा.श्रीमती एस.टी. फडोळ, आर.एन.वारुंगसे, श्रीमंत पतसंस्थेचे अध्यक्ष नारायण वाजे ,उपाध्यक्ष अरुण वारुंगसे, व्यवस्थापकीय संचालक भीमराव चव्हाण इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

प्रा.एस.आर. मोरे
इतिहास विभागप्रमुख
गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला,
भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, सिन्नर. जि. नाशिक

डॉ.पी.व्ही. रसाळ
प्राचार्य
जी.एम.डी. आर्ट्स, बी.डब्ल्यु. कॉमर्स अँण्ड
सायन्स कॉलेज सिन्नर जि. नाशिक

G.M.D. ARTS, B.W. COMMERCE & SCIENCE COLLEGE
SINNAR
422 103

# श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या जयंतीनिमित्त डुबेरेत कार्यक्रम



**डुबेरे : जयंतीनिमित्त श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ, नारायण वाजे, अरुण वारुंगसे, भीमराव चव्हाण, चंद्रशेखर बर्वे आदी.**

सकाळ वृत्तसेवा

डुबेरे, ता. २१ : येथे बाजीराव पेशवे यांच्या ३२१ वी जयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. बाजीरावांचे जन्मस्थळ असलेल्या ऐतिहासिक डुबेरे वाड्यात सिन्नर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ यांच्या हस्ते प्रतिमेचे व श्रीमंत पतसंस्थेतील श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. बाजीरावांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक ढाल, तलवार, भाला, बंदूक यांचे पूजन करण्यात आले. बाजीरावांच्या नवव्या पिढीचे वंशज प्रा. चंद्रशेखर बर्वे यांनी बाजीरावांचा इतिहास व वाड्याची रचनेविषयी माहिती दिली. वास्तुकलेचा वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून केलेली वाड्याची रचना येणाऱ्या पिढीसाठी अभ्यासदायक ठरेल, असे मत डॉ. रसाळ यांनी व्यक्त केले.

श्रीमंत पतसंस्थेचे अध्यक्ष नारायण वाजे, उपाध्यक्ष अरुण वारुंगसे, व्यवस्थापकीय संचालक भीमराव चव्हाण, आयुब शेख, महेश कुटे, उपप्राचार्य डॉ. डी. एम. जाधव, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. व्ही. एस. सोनवणे, रामनाथ वामने, रासेयो कार्यक्रम अधिकारी एस. बी. कर्डक, संतोष जाधव, इतिहास विभागप्रमुख श्रीमती एस. आर. मोरे, एस. एम. गाडे, डी. एन. वाजे, श्रीमती सुजाता फडोळ, आर. एन. वारुंगसे, संदीप पानसरे, अनिल वारुंगसे उपस्थित होते.